पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९१**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ३०/०९/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार दिनांक **३०/०९/२०२०** रोजी **दु.०२.३० वा.** महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती.सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
२. मा.संतोष बबन कांबळे
३. मा.अभिषेक गोविंद बारणे
४. मा.बुर्डे सुवर्णा विकास

मा.उल्हास जगताप - नगरसचिव हे अधिकारी सभागृहात उपस्थित होते.

----------

सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने उपस्थित सन्मा.सदस्यांनी सदरची सभा बुधवार दिनांक ०७/१०/२०२० रोजी दुपारी २.१५ वाजेपर्यंत तहकूब केली.



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९१**

( दिनांक ३०/०९/२०२० दु.२.३० वा. ची तहकूब सभा )

**दिनांक – ०७/१०/२०२०** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.३०/०९/२०२० दु.२.३० वा. ची **तहकूब** सभा **बुधवार दि.०७/१०/२०२०** रोजी दु**.०२.१५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा.सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चौंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
६. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे राहुल तानाजी
७. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८. मा.कदम शशिकांत गणपत
९. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
१०. मा.संतोष बबन कांबळे
११. मा.अभिषेक गोविंद बारणे
१२. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१३. मा.फुगे भिमाबाई पोपट
१४. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१५. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त(१), मा.पवार - अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.इंगळे, मा.चारटणकर – उप आयुक्त, मा.पाटील – शहर अभियंता, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.खांडेकर, मा.बोदडे – सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.लडकत, मा.पाटील, मा.वाघुंडे – कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे – पशु वैद्यकिय

अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.गायकवाड – जनता संपर्क अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.गोफणे– आरोग्य अधिकारी, हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, .डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.कोळंबे – मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.निकम – सह शहर अभियंता, मा.दुरगुडे, मा.झगडे, मा.लोणकर, मा.खोत - सहाय्यक आयुक्त, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.मोरे, मा.टकले – कार्यकारी अभियंता हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.शितल शिंदे                                    अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक लक्ष्मण ढंडे, केंद्रीय राज्यमंत्री सुरेश अंगडी, माजी केंद्रीय मंत्री श्री.जयवंत सिंग, अणू शास्त्रज्ञ शेखर बसू, माजी प्रधान मुख्य वन संरक्षक श्री.माधव गोगटे, भागवताचार्य वासुदेव नारायण उत्पात, सामाजिक कार्यकर्ते श्री.पोपटराव फुगे तसेच कोविडमुळे मृत्युमुखी पडलेले शहरातील नागरिक या सर्वांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे. आजच्या सभेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

----------

दिनांक २३/०९/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १९०) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा .सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७५१७                                    विषय क्रमांक – १
दिनांक – ०७/१०/२०२०                                    विभाग – ज.शु.के.से.क्र.२३
सुचक – मा.संतोष कांबळे                                  अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/१४७/२०२०, दि.२८/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे–

निगडी सेक्टर क्र.२३ येथील जलशुध्दीकरण केंद्रावरुन संपूर्ण पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा केला जातो. जलशुध्दीकरण केंद्राचे कामकाज हे अव्याहतपणे (विनाखंड) २४ तास चालू असून त्याकरिता प्रत्येकी ८ तासांच्या ३ शिफ्टमध्ये कर्मचारी असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत टप्पा क्र.२ व केमिकल हाऊसकरिता मनपाकडील तांत्रिक दृष्ट्या कुशल कामगार कमी असल्याने जलशुद्धीकरण केंद्र चालवण्यासाठी कुशल/अर्धकुशल/अकुशल कामगार खाजगी ठेकेदारांमार्फत पुरविले जातात. सद्यस्थितीमध्ये सदर कामासाठी "जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.२,३,४ व केमिकल हाउस खाजगीकरणाने चालविणे" या नव्याने प्रसिद्ध केलेल्या कामाची निविदा प्रक्रिया सुरु असून सदर निविदे

बाबत एका निविदा धारकाने मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे व त्यामुळे "जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.२ व केमिकल हाऊस खाजगीकरणाने चालविणे" या चालू कामास नवीन कामाचा आदेश होई पर्यंत मुदत वाढ देणेच्या प्रस्तावास दि.०२/०४/२०१९ रोजी मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिली आहे. सबब "जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.२ व केमिकल हाऊस खाजगीकरणाने चालविणे" हे काम चालू ठेकेदाराकडून सुरु ठेवणेत आले असून या चालू कामाकरिता तूर्तास ०५/०४/२०२१ पर्यंतच्या मुदत वाढ कालावधीकरिता सुधारित अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. मनपाचे सन २०१९-२० चे सुधारित व २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रक तयार करते वेळी विभागाने चालू कामास आवश्यक रकमेचीच तरतूद केली आहे व "जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.२,३,४ व केमिकल हाउस खाजगीकरणाने चालविणे" या नवीन कामास सुरुवात होण्याच्या दृष्टीने या कामासाठी तरतूद करणेत आली आहे. परंतु सद्यस्थितीमध्ये नवीन कामाच्या निविदेबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये प्रकरण प्रलंबित असलेच्या अडचणीमुळे "जलशुद्धीकरण केंद्र से.क्र.२३ येथील टप्पा क्र.२ व केमिकल हाऊस खाजगीकरणाने चालविणे" या चालू कामासाठी ठेकेदारास केलेल्या कामाचे व मुदत वाढ कालावधीदरम्यान होणा-या कामाचे देयक अदा करणेसाठी तरतूद उपलब्ध नसून या करिता "जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.२,३,४ व केमिकल हाउस खाजगीकरणाने चालविणे" या नवीन कामासाठी उपलब्ध असलेली तरतूद खालील प्रमाणे अ.क्र.१ ते २ या कामांसाठी वाढ/घट करून चालू कामास वर्ग करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पानांक | सन २०२०-२१ ची तरतूद र.रु | वाढ | घट | प्रस्तावित सुधारित तरतूद र.रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेक्टर क्र.२३ निगडी येथील जल शुद्धीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र.२ व केमिकल हाऊस खाजगीकरणाने चालविणे (२०१५-१६) | ८८०/८ | ३७००००० | ४९००००० | ० | ८६००००० | काम चालू |
| २ | सेक्टर क्र.२३ निगडी येथील जल शुद्धीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र. २,३,४ व केमिकल हाउस खाजगीकारणाने चालविणे | ८८१/१३ | १२०००००० | ० | ४९००००० | ७१००००० | निविदा प्रक्रिया सुरु व न्यायालयीन प्रकरण |
| | **एकूण** | | **१५७०००००** | **४९०००००** | **४९०००००** | **१५७०००००** | |

तरी तूर्तास दि.०५/०४/२०२१ पर्यंतच्या मुदतवाढीच्या कालावधीसाठी व तसेच मा.आयुक्त सो. यांचे कडील आदेश क्र.काक/३/कावि/१५४/२०१८, दि.२८/०६/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत नियुक्त केलेल्या कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०१५ च्या अधिसूचनेनुसार दर महा किमान वेतन अदा करणेबाबत किमान वेतन कायदा १९४८ नुसार कामगारांची वेळोवेळी होणारी वेतनामधील दरवाढ गृहीत

धरून येणा-या सुमारे र.रु.४९,००,०००/- (सुधारित एकूण र.रु.३,७८,७९,१८१/- - र.रु.३,३०,३०,८४३/- = र.रु.४८,४८,३३८/-) चे वाढीव खर्चास व तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५१८ विषय क्रमांक – २

दिनांक – ०७/१०/२०२० विभाग – ज.शु.के.से.क्र.२३

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/१४६/२०२०, दि.२८/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

निगडी सेक्टर क्र.२३ येथील जलशुध्दीकरण केंद्रावरुन संपूर्ण पिंपरी चिंचवड शहराला पाणी पुरवठा केला जातो. जलशुध्दीकरण केंद्राचे कामकाज हे अव्याहतपणे (विनाखंड) २४ तास चालू असून त्याकरिता प्रत्येकी ८ तासांच्या ३ शिफ्टमध्ये कर्मचारी असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत टप्पा क्र.३ व ४ करिता मनपाकडील तांत्रिकदृष्ट्या कुशल कामगार नसल्याने जलशुद्धीकरण केंद्र चालवण्यासाठी अर्धकुशल/अकुशल कामगार खाजगी ठेकेदारांमार्फत पुरविले जातात. सद्यस्थितीमध्ये सदर कामासाठी "जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.२,३,४ व केमिकल हाउस खाजगीकरणाने चालविणे" या नव्याने प्रसिद्ध केलेल्या कामाची निविदा प्रक्रिया सुरु असून सदर निविदे बाबत एका निविदा धारकाने मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे व त्यामुळे "जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.३ व ४ खाजगीकरणाने चालविणे" या चालू कामास नवीन कामाचा आदेश होई पर्यंत मुदत वाढ देणेच्या प्रस्तावास दि.०२/०४/२०१९ रोजी मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिली आहे. सबब "जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.३ व ४ खाजगीकरणाने चालविणे" हे काम चालू ठेकेदाराकडून सुरु ठेवणेत आले असून या चालू कामाकरिता तूर्तास ०५/०४/२०२१ पर्यंतच्या मुदत वाढ कालावधीकरिता सुधारित अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. मनपाचे सन २०१९-२० चे सुधारित व २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रक तयार करते वेळी विभागाने चालू कामास आवश्यक रकमेचीच तरतूद केली आहे व "जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.२,३,४ व केमिकल हाउस खाजगीकरणाने चालविणे" या नवीन कामास सुरुवात होण्याच्या दृष्टीने या कामासाठी तरतूद करणेत आली आहे. परंतु सद्यस्थितीमध्ये नवीन कामाच्या निविदेबाबत मा.उच्च न्यायालयामध्ये प्रकरण प्रलंबित असलेच्या अडचणीमुळे "जलशुद्धीकरण केंद्र से.क्र.२३ येथील टप्पा क्र.३ व ४ खाजगीकरणाने चालविणे" या चालू कामासाठी ठेकेदारास केलेल्या कामाचे व मुदत वाढ कालावधीदरम्यान होणा-या कामाचे देयक अदा करणेसाठी तरतूद उपलब्ध नसून या करिता "जलशुद्धीकरण केंद्र येथील टप्पा क्र.२,३,४ व केमिकल हाउस खाजगीकरणाने चालविणे" या नवीन कामासाठी उपलब्ध असलेली तरतूद खालील प्रमाणे अ.क्र.१ ते २ या कामांसाठी वाढ/घट करून चालू कामास वर्ग करणे अवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पानांक | सन २०२०-२१ ची तरतूद र.रु | वाढ | घट | प्रस्तावित सुधारित तरतूद र.रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेक्टर क्र.२३ निगडी येथील जल शुद्धीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र.३व ४ खाजगीकरणाने चालविणे (२०१५-१६) | ८८०/७ | ३०००००० | ४३००००० | ० | ७३००००० | काम चालू |
| २ | सेक्टर क्र.२३ निगडी येथील जल शुद्धीकरण केंद्रांतर्गत टप्पा क्र. २,३,४ व केमिकल हाउस खाजगीकारणाने चालविणे | ८८१/१३ | १२०००००० | ० | ४३००००० | ७७००००० | निविदा प्रक्रिया सुरु व न्यायालयीन प्रकरण |
| | एकूण | | १५०००००० | ४३००००० | ४३००००० | १५०००००० | |

तरी तुर्तास दि.०५/०४/२०२१ पर्यंतच्या मुदतवाढीच्या कालावधीसाठी व तसेच मा.आयुक्त सो. यांचेकडील आदेश क्र.काक/३/कावि/१५४/२०१८, दि.२८/०६/२०१८ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत नियुक्त केलेल्या कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक २४ फेब्रुवारी २०१५ च्या अधिसूचनेनुसार दर महा किमान वेतन अदा करणेबाबत किमान वेतन कायदा १९४८ नुसार कामगारांची वेळोवेळी होणारी वेतनामधील दरवाढ गृहीत धरून येणा-या सुमारे र.रु.४३,००,०००/- (सुधारित एकूण र.रु.३,०८,९७,५४६/- - र.रु.२,६६,३७,२११/- = र.रु.४२,६०,३३५/-) चे वाढीव खर्चास सदर तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५१९ विषय क्रमांक – ३
दिनांक – ०७/१०/२०२० विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/१२५/२०२०, दि.०४/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

मे.ट्रस्ट हेल्थकेअर फाऊंडेशन यांनी ऑटो क्लस्टर येथे एक्स-रे सुविधा पुरविणेबाबत दिनांक ०२.०९.२०२० रोजी पत्रान्वये कळविले आहे. एका एक्स रे साठी र.रु.१५०/- आकारण्यात येणार असल्याचे लेखी कळविले आहे. सध्या तिन महीने कालावधीसाठी या दराने काम देणेकामी सादर केले असे. तातडीक बाब म्हणुन भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७ नुसार कोरोना (COVID 19) या साथीच्या रोगावर उपचारासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३)(क) नुसार तात्काळ नागरिकांच्या तपासण्या करणेकामी निविदा प्रसीध्द न करता थेट पध्दतीने एका एक्सरे साठी र.रु.१५०/- या प्रमाणे मे.हेल्थकेअर ट्रस्ट फाऊंडेशन यांना काम देणेबाबत मान्यता व संबंधीतांशी करारनामा करणेस मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, एका एक्स-रे करीता र.रू.१५०/- प्रमाणे ३०००

एक्स-रे साठी प्रत्यक्ष येणा-या खर्चास व संबंधितांशी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५२० विषय क्रमांक – ४

दिनांक – ०७/१०/२०२० विभाग – पाणीपुरवठा

सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/८/कावि/५४३/२०२०, दि.०७/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.15/02/2019-20 अन्वये सेक्ट क्र.२३ निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रातील क्लॅरीफॉक्यू लेटर ब्रिजचे रोटेटिंग असेम्बली बदलण्याचे काम करणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.अनंत इंडस्ट्रीयल सप्लायर्स नि.र.रू.98,23,611/- (अक्षरी र.रू.अठ्ठ्याण्णव लाख तेवीस हजार सहाशे अकरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.98,23,310/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.98,23,310/- पेक्षा 1.98% कमी म्हणजेच र.रु.96,28,808/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.301/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.0/- = एकुण र.रु.96,29,109/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५२१ विषय क्रमांक – ५

दिनांक – ०७/१०/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मसाभां/१७/कावि/३३४/२०२०, दि.११/०९/२०२०

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधतात्मक उपाय योजना करणेकामी भविष्यात केल्या जाणा-या कोवीड केअर सेंटर तसेच Institutional Quarantine केलेल्या व्यक्ती व रुग्णासाठी आवश्यक साहित्य साधे बेड खेरदीकामी अल्प मुदतीची जाहिर सूचना क्रं.04/2020-21 अन्वये दर पत्रक मागविणेत आले होते त्यानुसार मे.ब्लॅक स्लेट. मुंबई यांचे प्रति नग 2011/- प्रमाणे लघुत्तम दर प्राप्त झालेले आहेत. जाहीर सुचनेतील अट क्र.19 मध्ये L1 च्या दराने L1 ते L5 पर्यंत कामाची समान विभागणी करून देणेत येईल अशी अट विहीत करणेत आली आहे. तथापि दोन पुरवठा धारक साहित्यचा पुरवठा करणेस तयार असलेने दि.1/08/2020 रोजीच्या मान्य प्रस्तावान्वये त्यातील दोन पुरवठाधारकांना जाहिर सुचनेतील अट क्र.19 नुसार मे.ऑर्थरॉन टेक्नॉलॉजी अॅन्ड

एंटरप्रायजेस, चिंचवड यांना 500 नग व मे.ब्लँक स्लेट, मुंबई यांना 500 नग HOSPITAL BED पुरवठ्याकामी मान्यता घेणेत आलेली आहे. मे.ऑर्थरॉन टेक्नॉलॉजी अँन्ड एंटरप्रायजेस, चिंचवड यांना 500 नग व मे.ब्लँक स्लेट, मुंबई यांना 500 नग प्रति नग र.रु.2011 प्रमाणे एकुण र.रु.20,11,000/- मध्ये खरेदी करणेस चे खर्चास व करारनामा करुन कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५२२ विषय क्रमांक – ६
दिनांक – ०७/१०/२०२० विभाग– ब क्षेत्रिय, जलनि:सारण
सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.बक्षेका/जनि/कावि/७४४/२०२०, दि.१४/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ब क्षेत्रिय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई अधुनिक यांत्रिकी पध्दतीने करणेकामी (सक्शन, जेटींग सह रिसायकलींग मशिनच्या सहाय्याने) या कामास मुदतवाढ (द्वितीय वर्ष सन २०२०-२१ पर्यंत) मे.आर्यन पंप्स ऍण्ड एनव्हायरो सोल्युशन प्रा.लि यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.४९८२ दि.१२/०७/२०१९ नुसार करारनामा शर्तीनुसार दि.१८/०९/२०१९ च्या आदेशान्वये कामाचे आदेश देणेत आलेले होते. सदर कामाची मुदत दिनांक १७/०९/२०२० पर्यंत आहे. निविदा अटी व शर्ती (A) क्र.३ नुसार सदर निविदेतील दर हे निविदा कालावधी पर्यंत कायम राहतील. सदर निविदेचा कार्य कालावधी ०७ (सात) वर्षे आहे. तथापि कामाचा आदेश व करारनामा हा ०१ (प्रथम) वर्षासाठी देणेत आलेला आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेऊन पुढील प्रत्येक वर्षासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल. तसेच निविदा अटी व शर्तीनुसार एक वर्षानंतर भाववाढ फरक देय राहील. त्यानुसार ठेकेदाराने सदरचे काम प्रथम वर्षात समाधानकारक पूर्ण केलेले आहे. द्वितीय वर्षासाठी (१७.०९.२०२१ पर्यत) मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात पान क्र.८९४ अ.क्र.'ब' वर र.रू.१,१८,००,०००/- तरतुद नमूद करणेत आलेली आहे. निविदा अटी व शर्ती (A) क्र.३ नुसार मा.स्थायी समितीने ठरावात नमूद केलेला १ वर्षे कालावधीची मुदत दिनांक १७/०९/२०२० रोजी पुर्ण होत आहे. वर नमूद केलेनुसार ठेकेदार मे. आर्यन पंप्स ऍण्ड एनव्हायरो सोल्युशन प्रा.लि. यांस पिंपरी चिंचवड महानगरपालिका ब क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनिःसारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे (सक्शन, जेटींग सह रिसायकलिंग मशिनच्या सहाय्याने).या कामास दिनांक १८/०९/२०२० पासून १७/०९/२०२१ पर्यंत द्वितीय वर्षासाठी मुदतवाढ मिळणेस व भाववाढ फरक एक वर्ष कालावधीनंतर अदा करणे व या कालावधीसाठी र.रू.१,२९,००,०००/- (अक्षरी र.रू.एक कोटी एकोणतीस लाख फक्त) च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५२३ | विषय क्रमांक – ७
दिनांक – ०७/१०/२०२० | विभाग– मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अभिषेक बारणे | अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.अति. आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मसाभां/१७/कावि/३५४/२०२०, दि.१५/०९/२०२०

मा.अति. आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधतात्मक उपाय योजना करणेकामी भविष्यात केल्या जाणा-या कोवीड केअर सेंटर तसेच Institutitonal Quarantine केलेल्या व्यक्ती व रुग्णासाठी आवश्यक साहित्य Bed Side Locker खरेदीकामी अल्प मुदतीची जाहिर सूचना क्रं.06/2020-21 अन्वये दर पत्रक मागविणेत आले होते. त्यानुसार त्यानुसार मे निर्मीती इंजिनिअरिंग कार्पो.पिंपरी यांचे Bed Side Locker करिता प्रति नग 2530/- प्रमाणे लघुत्तम दर प्राप्त झालेले आहेत. जाहीर सुचनेतील अट क्र.19 मध्ये L1 च्या दराने L1 ते L5 पर्यंत कामाची समान विभागणी करुन देणेत येईल अशी अट विहीत करणेत आली आहे. तथापि मा.आयुक्त. सो यांनी सदर साहित्याचा तातडीने पुरवठा करणेकामी L1 च्या दराने L1 ते L6 या पुरवठाधारकांना प्रति 250 नग पुरवठा करणेस तयार असलेने मा.आयुक्त सो. यांचेकडील दि.1/08/2020 रोजीच्या मान्य प्रस्तावान्वये त्यातील सहाही पुरवठाधारकांना आदेश देणेस मंजुरी देणेत आलेली आहे. त्यानुसार जाहिर सुचनेतील अट क्र.19 नुसार एकुण र.रु.37,95,000/- (अक्षरी र.रू.सदोतीस लाख पंच्यान्नव हजार फक्त) मध्ये Bed Side Locker 1500 नग खरेदी करणेस चे खर्चास व करारनामा करुन कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५२४ | विषय क्रमांक – ८
दिनांक – ०७/१०/२०२० | विभाग– ह क्षेत्रिय, जलनि:सारण
सुचक – मा.संतोष कांबळे | अनुमोदक – मा.शशिकांत कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षेका/जनि/कावि/७४५/२०२०, दि.१७/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई आधुनिक यांत्रिकी पध्दतीने करणेचे काम मे.आर्यन पंप्स अॅण्ड एनव्हायरो सोल्युशन प्रा.लि.यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.४६७८ दिनांक २८/०२/२०१९ नुसार करारनामा शर्तीनुसार दि.१९/०९/२०१९ च्या आदेशान्वये कामाचे आदेश देणेत आलेले होते. सदर कामाची मुदत दिनांक १८/०९/२०२० पर्यंत आहे. निविदा अटी व शर्ती (A) क्र.३ नुसार सदर निविदेतील दर हे निविदा कालावधी पर्यंत कायम राहतील. सदर निविदे चा कार्य कालावधी ०७ (सात) वर्षे आहे. तथापि कामाचा आदेश व करारनामा हा ०१ (प्रथम) वर्षासाठी देणेत आलेला आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेऊन पुढील प्रत्येक वर्षासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल. तसेच निविदा अटी व शर्तीनुसार एक वर्षानंतर भाववाढ फरक देय राहील. त्यानुसार ठेकेदाराने सदरचे काम प्रथम वर्षात समाधानकारक पूर्ण केलेले आहे. द्वितीय वर्षासाठी (१८.०९.२०२१ पर्यत) मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी सन २०२०-२१

चे अंदाजपत्रकात पान क्र.८९४ अ.क्र.‘ह’ वर र.रू.१,१८,४४,०००/- तरतुद नमूद करणेत आलेली आहे. निविदा अटी व शर्ती (A) क्र.३ नुसार मा.स्थायी समितीने ठरावात नमूद केलेला १ वर्षे कालावधीची मुदत दिनांक १८/०९/२०२० रोजी पुर्ण होत आहे. वर नमूद केलेनुसार ठेकेदार मे.आर्यन पंप्स ॲण्ड एनव्हायरो सोल्युशन प्रा.लि.यांस पिंपरी चिंचवड महानगरपालिका ह क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनिःसारण नलिका मॅनहोल चेंबर्सची सफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे (सक्शन, जेटींग सह रिसायकलिंग मशिनच्या सहाय्याने) या कामास दिनांक १९/०९/२०२० पासून १८/०९/२०२१ पर्यंत द्वितीय वर्षासाठी मुदतवाढ मिळणेस व भाववाढ फरक एक वर्ष कालावधी नंतर अदा करणे व या कालावधीसाठी र.रू.१,२९,००,०००/-(अक्षरी र.रु.एक कोटी एकोणतीस लाख फक्त) च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५२५ विषय क्रमांक – ९

दिनांक – ०७/१०/२०२० विभाग– फ क्षेत्रिय, जलनि:सारण

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षेका/जनि/कावि/७४७/२०२०, दि.१७/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका फ क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई आधुनिक यांत्रिकी पध्दतीने करणेचे काम मे.आर्यन पंप्स एँड एनव्हायरो सोल्युशन प्रा.लि. यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.4678 दि.28/02/2019 नुसार करारनामा शर्तीनुसार दि.19/09/2019 च्या आदेशान्वये कामाचे आदेश देणेत आलेले होते. सदर कामाची मुदत दिनांक 18/09/2026 पर्यंत आहे. निविदा अटी व शर्ती (A) मधील अट क्र.3 नुसार सदर निविदेतील दर हे निविदा कालावधी पर्यंत कायम राहतील. तसेच अट क्र.32 नसार त्या कालावधीत भाववाढ फरक देय राहील. सदर निविदेचा कार्य कालावधी 7 (सात) वर्ष आहे. तथापि कामाचा आदेश व करारनामा हा 01 (प्रथम) वर्षासाठी करणेत आलेला आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेवून पुढील प्रत्येक वर्षासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल. तसेच निविदा अटी व शर्तीनुसार भाववाढ फरक देय राहील असे आहे. त्यानुसार ठेकेदार सदरचे काम प्रथम वर्षात समाधानकारकरित्या पुर्ण करत आहे. द्वितीय वर्षासाठी (18.09.2021 पर्यंत) मा.स्थायी समितीची मंजूरी प्राप्त करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी सन 2020-21 चे अंदाजपत्रकात पान क्र.894, अ.क्र. फ वर र.रु.1,18,00,000/- तरतुद नमूद करणेत आलेली आहे. निविदा अटी व शर्ती (A) मधील अट क्र.3 नुसार मा.स्थायी समितीने ठरावात नमुद केलेली 1 वर्षे कालावधीची मुदत दिनांक 18/09/2020 रोजी पुर्ण होत आहे. वर नमुद केलेनुसार ठेकेदार मे. आर्यंन पंप्स एँड एनव्हायरो सोल्युशन प्रा.लि. यांस पिंपरी चिंचवड महानगरपालिका फ क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची सफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे (सक्शन, जेटींग सह रिसायकलींग मशिनच्या सहाय्याने) या कामास दिनांक 19/09/2020 पासून 18/09/2021 पर्यंत द्वितीय वर्षासाठी मुदतवाढ मिळणेस व या कालावधीसाठी र.रु.1,29,00,000/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणतीस लाख फक्त) च्या खर्चास व भाववाढ फरक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५२६ विषय क्रमांक – १०
दिनांक – ०७/१०/२०२० विभाग– स्थापत्य ब मुख्यालय
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/३२६/२०२०, दि.१७/०९/२०२०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.73/1/2019-20 अन्वये प्रभाग क्र.१८ ताब्यातील डी.पी. रस्ते विकसित करणेकामी मे.क्लीन्सी कंन्स्ट्रक्शन प्रा लि. नि.र.रू.3,79,33,815/- (अक्षरी र.रु.तीन कोटी एकोणऐंशी लाख तेहतीस हजार आठशे पंधरा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.3,69,46,844/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.3,69,46,844/- पेक्षा 21.99% कमी म्हणजेच र.रु.2,88,22,233/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.9,17,121/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.69,850/- = एकुण र.रु.2,98,09,204/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५२७ विषय क्रमांक – ११
दिनांक – ०७/१०/२०२० विभाग– इ क्षेत्रिय, स्थापत्य
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शशिकांत कदम
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/इक्षे/कावि/४५५/२०२०, दि.०४/०९/२०२०

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील इ विभागीय कार्यक्षेत्रतील सन २०१९-२० साठी वार्ड क्र.४ दिघी येथील आरक्षण क्र.२/१२२ मध्ये “शाळा इमारत बांधणेया कामाचा अंदाजपत्रकीय र.रू.१२,४३,७१,५०३/- इतकी महापालिका सभा समिती ठराव क्र.४२२ दि.२०/०६/२०१९. चे अन्वये प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. प्रस्तुत कामाचे नियोजन करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुक करणे आवश्यक आहे. या कामाचे तांत्रिक दृष्ट्या आवश्यकतेनुसार व स्थापत्य विषयक कामांच्या बाबींचे देखरेख करणे, दैनंदिनी तयार करणे, गुणवत्ता तपासणे इ. निविदा पश्र्चात (post tender activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत प्रकल्प सल्लागार यांची कार्यकारी अभियंता यांच्या मंजूरीनुसार दरसुची दि. १३ / ०५ / २०२० रोजी मागविणेत आलेली आहे. त्यानुसार मे.किमया असोसिएट्स आर्किटेक्टस् अँण्ड प्लॅनर्स यांचेकडुन १.९० इतका लघुत्तम दर प्रास झाला आहे. सदर प्रकल्पासाठी मनपाच्या पॅनलवर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार

मे.किमया असोसिएट्स आर्किटेक्टस् अँण्ड प्लॅनर्स यांची नियुक्ती करणे बाबतची विहित कार्यवाही पूर्ण करणेत आलेली आहे. मे.किमया असोसिएट्स आर्किटेक्टस् अँण्ड प्लॅनर्स यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे कलेली आहेत. वरील बाबींचा विचार करता सदर कामासाठी मे.किमया असोसिएट्स आर्किटेक्टस् अँण्ड प्लॅनर्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन निविदा पश्चात १.९०% (Post Tender Activity) दराने उपरोक्त कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५२८ विषय क्रमांक – १२

दिनांक – ०७/१०/२०२० विभाग– वाय.सी.एम.एच.

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१४७४/२०२०, दि.१८/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात कोविड-१९ चे कामकाजाकरीता नव्याने एचडीयु व आयसीयु विभाग सुरू करणेत येणार असल्याने त्याकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात १२८ स्टाफनर्स पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी वर्तमानपत्रात व मनपा वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांमधून पात्र उमेदवारांची गुणाणुक्रमे व आरक्षणानुसार निवड करणेत आलेली आहे. निवड झालेल्या एकूण-१२८ उमेदवारांना दिलेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५२९ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०७/१०/२०२० विभाग– मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.संतोष कांबळे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/११४७/२०२०, दि.१७/०९/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपा पशुवैद्यकीय विभागाचे मागणीनुसार आवश्यक श्वानसंतती नियमन शस्त्रकिया केंद्रासाठी निर्जंतुकीकरण खरेदी करणेकामी ई.नि.सु.क्र.13/2020-21 प्रसिध्द करुन ऑनलाईन निविदा दर मागविणेत आले होते. प्राप्त निविदेमधील लघुत्तम पुरवठाधारक मे.इनोव्हेटीव क्लिनिंग सिस्टीम प्रा.लि. मुंबई यांचे एकुण 05 बाबीसाठी एकुण र.रु.35,72,400/- (अक्षरी र.रू.पस्तीस लाख बाहत्तर हजार चारशे फक्त) लघुत्तम दर प्राप्त झाले आहेत. प्राप्त लघुत्तम दर हे मनपा अंदाजपत्रकीय दर एकुण र.रु.35,89,116/- पेक्षा 0.46 टक्केने कमी आहेत. सदरचे दर स्विकृत करणेस मान्यता दिलेली असुन सदर खर्चास मान्यता व मे.इनोव्हेटीव क्लिनिंग सिस्टीम प्रा. लि. मुंबई त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५३० | विषय क्रमांक – १४

दिनांक – ०७/१०/२०२० | विभाग– मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.शितल शिंदे | अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभां/५/कावि/८४६/२०२०, दि.१७/०९/२०२०

मा.सहा.आयुक्त(भांडार)यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विविध विभागांसाठी आवश्यक प्रिंटर्स खरेदीकामी केंद्र शासनाच्या गव्हर्मेंट ई-मार्केटप्लेस वर GeM Bid No.GEM/2020/B/617796 प्रसिध्द करुन मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये मे.प्रियाटेक सोल्युशन (पुणे) प्रा.लि., पुणे यांनी सादर केलेली निविदा एकूण र.रु.१८,६१,०१७/- + कर लघुत्तम प्राप्त झालेली असुन स्विकृत करण्यात आलेली आहे. मा.आयुक्त सो यांनी प्रिंटर्स खरेदीस दि.२७/०६/२०२० अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांच्या समवेत करारनामा करुन पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने सदर प्रिंटर्स खरेदी करणेकामी होणारा खर्च एकूण र.रु.१८,६१,०१७/- + कर चे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५३१ | विषय क्रमांक – १५

दिनांक – ०७/१०/२०२० | विभाग– वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम | अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/३/कावि/५९४/२०२०, दि.२१/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

कोरोना विषाणूचे संसर्गामुळे कोवीड १९ या संसर्गजन्य आजाराच्यासाथीमुळे उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीचे अनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील दि.१४ मार्च २०२० रोजीच्या अधिसूचनेनुसार कोरोना विषाणूच्या उद्भवलेल्या संसर्ग रोगाचा प्रतिबंध नियंत्रणाकरीता मा.आयुक्त महापालिका अशा क्षेत्रामध्ये सर्व शासकिय विभाग व संस्थांच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांची सेवा निर्देशित करतील अशी तरतुद आहे. मे.रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा. लि. यांचेकडील अधिकारी/कर्मचारी अजूनही पूर्वी प्रमाणेच यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरीता कामकाज करीत असून सदरचे कामकाज यापुढेही चालू ठेवणेबाबत अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय यांनी मागणी केलेली आहे. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका व मे.रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेमध्ये दि.०९-०६-२०२० रोजी करण्यात आलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती तसेच वैद्यकिय विभागाकडील आदेश क्र.वैद्य/३/कावि/३९०/२०२०, दि.०३-०७-२०२० नुसार यापुढील वाढीव कालावधीचा करारनामा करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामधील मे.रुबी अल केअर सर्व्हिसेस प्रा. लि. यांचे कॅथलॅबच्या आय.सी.यू. मध्ये ३० बेड ऐवजी २७ बेड अशी झालेली कपात विचारात घेऊन प्रचलित दर प्रति बेड/दिन र.रु.५,८४७/- नुसार त्यांचेकडील उपलब्ध ३० प्रोफशनल्स व २२८ वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी यांचे अधिग्रहण कालावधीतील वेतनाकरीता र.रु.४७,३६,०७०/- (अक्षरी र.रू.सत्तेचाळीस लाख छत्तीस हजार सत्तर फक्त) प्रती महिना याप्रमाणे दि.०१-०८-२०२० ते ३१-१०-२०२० अखेर ३ महिन्यांचे

कालावधीकरीता र.रु.१,४२,०८,२१०/- इतक्या अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५३२ विषय क्रमांक – १६

दिनांक – ०७/१०/२०२० विभाग– पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/१०२/२०२०, दि.२१/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV1/2-2020-21 अन्वये अ,ब,फ व ग प्रभागातील मैलाशुध्दीकरण केंद्रामधील स्लजची वाहतुक करणेकामी मे.भगवंत कन्स्ट्रक्शन (सचिन जे जाधव) यांचेकडुन निविदा र.रु.७४,९९,७४०/- वर निविदा दर प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदारांकडून र.रु.७४,९९,७४०/-पेक्षा -१४.४०% कमी या सुधारित दराने म्हणजेच र.रु.६४,१९,७७७/- (अक्षरी र.रू.चौसष्ठ लाख एकोणीस हजार सातशे सत्याहत्तर फक्त) पर्यंत काम करुन घेणेस व नियमानुसार निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर वेगळा अदा करणेसतसेच निविदा अटी नुसार भाववाढ कलम लागु असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५३३ विषय क्रमांक – १७

दिनांक – ०७/१०/२०२० विभाग– पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/१०३/२०२०, दि.२१/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV1/3-2020-21 अन्वये क,ड,ई व ह प्रभागातील मैलाशुध्दीकरण केंद्रामधील स्लजची वाहतुक करणेकामी मे.शुभम उद्योग यांचेकडुन निविदा र.रु.७४,९९,६८०/- वर निविदा दर प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदारांकडून र.रु.७४,९९,६८०/- पेक्षा -१४.७५% कमी या सुधारित दराने म्हणजेच र.रु.६३,९३,४७७/- (अक्षरी र.रू.त्रेसष्ठ लाख त्र्यान्नव हजार चारशे सत्याहत्तर फक्त) पर्यंत काम करुन घेणेस व नियमानुसार निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर वेगळा अदा करणेस तसेच निविदा अटी नुसार भाववाढ कलम लागु असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७५३४ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०७/१०/२०२० विभाग– शहर क्षयरोग नियंत्रण

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.संतोष कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.शक्षनिके/क्षय/कावि/१३२/२०२०, दि.२१/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या जा.क्र वैद्य/९/कावि/१८७०/२०२० दि.१७/०४/२०२० आदेशानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत कार्यरत कर्मचारी यांना किमान वेतन दरानुसार वेतन अदा करणेकामी वेतनाचा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियान राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत प्राप्त निधीतुन करणे व त्यानंतर वेतनातील फरक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडुन दरमहा प्रतिपुर्ती करुन कॉर्पोरेशन इंटीग्रेटेड हेल्थ ऍन्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी (टी.बी) पि.सी.एम.सी सोसायटीच्या बॅंक खात्यावर जमा करणेस व याकामी येणारा माहे जुन ते डिसेंबर २०२० पर्यत र.रु.११,५५,९३८/- खर्च कुटुंब कल्याण अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षाअंतर्गत मंजुर तरतुद र.रु.५,१४,००,०००/- मधुन करणेस तसेच मा.आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांना सुसुत्रीकरणाची प्रक्रीया पुर्ण झाल्यावर राष्ट्रीय आरोग्य् अभियानांतर्गत कार्यरत कर्मचा-यांच्या मानधनाकरिता वाढीव तरतुद कृती आराखडयात मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५३५ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०७/१०/२०२० विभाग– आरोग्य मुख्यालय

सुचक – मा.शशिकांत कदम अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.आमुका/११/कावि/२५१/२०२०, दि.१८/०९/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मनपा मालकीच्या इमारतीमधील कार्यालये, दवाखाने, मनपा शाळा, उद्याने व इतर ठिकाणी असणा-या जमिनीवरील व छतावरील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची शास्त्रोक्त पध्दतीने साफसफाई व स्वच्छता करणे याकामाची २ वर्ष कालावधीसाठी निविदा नोटिस क्र.९-१ ते ९-६/२०१६-२०१७ प्रसिध्द केली होती. सदर निविदेची मुळ मुदत दिनांक ३१/१२/२०१८ रोजी संपुष्टात आलेली आहे. तसेच सदर कामाची नविन निविदा प्रसिध्द केलेली असून, निविदा प्रक्रिया पुर्ण होणेस काही कालावधी लागणार असल्याने मे.साझ टॅंक क्लिन सर्व्हीसेस प्रा.लि. या संस्थेस दिनांक ०१/०९/२०२० ते दिनांक ३०/०९/२०२० अखेर (१ महिना) अथवा नविन निविदा कार्यवाही पूर्ण होईपर्यंत यापैकी जे प्रथम होईल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व त्याकरीता येणा-या र.रू.४,२९,०२०/- (अक्षरी र.रू.चार लाख एकोणतीस हजार वीस फक्त) अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३(क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७५३६ विषय क्रमांक – २०
दिनांक – ०७/१०/२०२० विभाग– नगररचना व विकास
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१५/१३६/२०२०, दि.२२/०९/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

